जा.क्र.सिंजिप/आवि/जिप्रप/हॉल/ 3015 /२०२६
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग
सिंधुदुर्गनगरी, दिनांक १६.११.२०२६

दरपत्रक नोटीस

विषय :-जिल्हा प्रशिक्षण केंद्र, सिंधुदुर्ग कार्यालयामार्फत आयोजीत प्रशिक्षणासाठी उपस्थित प्रशिक्षकांना राहणेसाठी दोन रुम भाडयाने उपलब्ध होणेसाठी दरपत्रकाबाबत....

जिल्हा प्रशिक्षण केंद्र, सिंधुदुर्ग कार्यालयामार्फत आयोजीत प्रशिक्षणासाठी **उपस्थित प्रशिक्षकांना राहणेसाठी दोन रुम भाडयाने उपलब्ध** होणेसाठी दरपत्रक मागविणेत येत आहेत. इच्छुक पुरवठादारांनी आपली दरपत्रके **वैद्यकिय अधिकारी, जिल्हा प्रशिक्षण केंद्र, सिंधुदुर्ग, आरोग्य विभाग,जि.प.सिंधुदुर्ग** यांचे नावे सिलबंद लखोटयात **दि.२०.११.२०२६ सायं. ४.०० वाजेपर्यंत आरोग्य विभाग, जि.प.सिंधुदुर्ग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग** या कार्यालयास प्रत्यक्षरित्या सादर करावयाची आहेत. त्यासाठी खालील अटी व शर्ती लागू राहतील

१) दरपत्रक लेटरहेड असावे.
२) दरपत्रकाबरोबर पॅन कार्ड, व्हॅट टीन नं. / व्हॅट लागू नसल्यास दुकानाचा नोंदणी असलेला प्रशासनाचा दाखला (Registration Certificate)
३) लिफाफयावर दरपत्रक असे नमुद करावे.
४) दरपत्रकातील नमुद दर सर्व करासहीत असावेत.
५) प्रशिक्षणाचा मर्यादित कालावधी तातडीची गरज लक्षात घेता प्रशिक्षण कार्यक्रमावर विपरित परिणाम होवू नये या कारणास्तव फक्त स्थानिक पुरवठादारांना (सिंधुदुर्ग जिल्हयातील पुरवठादारांना) प्राधान्य देणेत येईल.
६) दोन रुम योग्य व सुस्थितीत असल्याची खात्री झाल्यानंतरच देयकाचे भूगतान पी.एफ.एम.एस. व्दारे आदा करण्यात येईल. त्यासाठी आपल्या खात्याच्या पासबुकाची झेरॉक्स अथवा बॅंकेच्या खात्याचा तपशिल बीलासोबत जोडावीत.
७) आर्थिक वर्ष २०२६.२७ मध्ये लेखापरिक्षणात स्टेशनरीच्या दराबाबत अहवालात त्रुटी किंवा आक्षेप असल्यास त्याचे पुर्ततेबाबत संपूर्ण सहाकार्य करावे लागेल. तसेच आक्षेप पुर्ततेच्यावेळी आक्षेप पूर्तता अमान्य झाल्यास त्यात काही रक्कम जमा करणे आवश्यक झाल्यास आपल्याला आदा होणाऱ्या रक्कमेतून ती परस्पर वसूल करण्यात येईल.
८) दरपत्रक धारकाने कोणतीही अट घालू नये.
९) सदरची दरपत्रके मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार खाली सही करणार यांचा राहिल.
१०) प्राप्त दरपत्रके **दिनांक २०.११.२०२६. वेळ सायं** ५.१५ वाजता उघडण्यात येतील. त्यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

अ. क्र.	पदार्थाचे नाव	वर्णन / प्रमाण	रक्कम रु.
१	रुम भाडे प्रति दिन (एक रुम)	१) एका रुम मध्ये किमान दोन कॉट बेड झोपण्याची सर्व सोईयुक्त असलेले रुम असावी २) अटॅच बाथरुम व टॉयलेट असावे ३) ए.सी.ची व्यवस्था असावी.	

(डॉ.सई धुरी)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

वैद्यकिय अधिकारी
जिल्हा प्रशिक्षण केंद्र, सिंधुदुर्ग

प्रति,

१) नोटीस बोर्ड
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग
२) ईपोर्टल वेबसाईट